for annexure to L.A. Bill in Nag. Session 75, see pages 930 & 932 (Total 3)

## MAHARASHTRA ACT NO. XXI OF 1973

## THE MAHARASHTRA PUBLIC SERVICES (SUBORDINATE) SELECTION BOARDS ACT, 1973

महाराष्ट्र विधानमंडळाच्या पुढील अधिनियमास राज्यपाल यांची संमती दिनांक १८ एप्रिल १९७३ रोजी मिळाली असल्यामुळे तो, याद्वारे, सर्व लोकांच्या माहितीसाठी प्रसिद्ध करण्यात येत आहे.

बी. पी. दलाल,
सचिव, महाराष्ट्र शासन,
विधी व न्याय विभाग.

## MAHARASHTRA ACT NO. XXI OF 1973

## AN ACT TO PROVIDE FOR ESTABLISHMENT OF SELECTION BOARDS FOR RECRUITMENT TO CERTAIN SERVICES IN THE STATE

(राज्यपाल यांची संमती मिळाल्यानंतर महाराष्ट्र शासन राजपत्रात दिनांक २५ एप्रिल १९७३ रोजी प्रथम (इंग्रजीत) प्रसिद्ध केलेला)

### सन १९७३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१

**राज्यातील विवक्षित सेवांतील सेवाप्रवेशाकरिता निवड मंडळे स्थापन करण्याची तरतूद करण्यासाठी अधिनियम.**

**ज्याअर्थी,** राज्य शासन, विवक्षित स्थानिक प्राधिकरणे किंवा विधिद्वारे रचना करण्यात आलेला निगम निकाय किंवा कोणतीही सार्वजनिक परिसंस्था यांखालील दुय्यम सेवांमधील कर्मचारीवर्गाच्या सेवाप्रवेशाचा एकरूप दर्जा साध्य करणे आणि त्यांची निःपक्षपाती निवड करणे व ती तशी चालू ठेवणे यासाठी, आणि विशेषेकरून, अशा सेवांतील सेवाप्रवेशाच्या बाबतीत, आर्थिकदृष्ट्या व सामाजिक दृष्ट्या दुर्बल अशा घटकांतील व्यक्तींना अग्रक्रम देण्यासंबंधीच्या धोरणाची अंमलबजावणी

करणे यासाठी राज्यातील विनिर्दिष्ट क्षेत्रांसाठी लोकहितास्तव निवड मंडळे स्थापन करणे आणि त्यांच्या शक्ती व कर्तव्ये आणि उपरोक्त प्रयोजनांशी संबंधित बाबी यांची तरतूद करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या तेविसाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

**संक्षिप्त नाव व प्रारंभ.** १. (१) ह्या अधिनियमास, महाराष्ट्र लोकसेवा (दुय्यम) निवड मंडळे अधिनियम, १९७३ असे म्हणता येईल.

(२) तो, राज्य शासन शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे नेमील अशा तारखेस अंमलात येईल.

**व्याख्या.** २. संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर, या अधिनियमात,—

(१) "नियुक्ति प्राधिकरण" म्हणजे, दुय्यम सेवेतील पदावर कायम नियुक्ती करण्यास सक्षम असेल असे प्राधिकरण ;

(२) "सदस्य" म्हणजे, निवड मंडळाचा सदस्य आणि त्यात त्याच्या अध्यक्षाचा समावेश होईल ;

(३) "नगरपालिका" म्हणजे, महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम, १९६५ याच्या अर्थांतर्गत नगरपालिका ;

(४) "विहित" म्हणजे, नियमांद्वारे विहित ;

(५) "प्रदेश" म्हणजे, अनुसूची एक च्या स्तंभ (१) मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेला प्रदेश आणि असा प्रदेश हा, त्या अनुसूचीच्या स्तंभ (२) व (३) मध्ये त्यासमोर विनिर्दिष्ट केलेली क्षेत्रे व त्यांची मुख्यालये यांचा मिळून होईल ;

(६) "नियम" म्हणजे, या अधिनियमान्वये राज्य शासनांकडून करण्यात आलेले नियम ;

(७) "निवड मंडळ" म्हणजे, या अधिनियमाच्या कलम ३ अन्वये रचना करण्यात आलेले प्रादेशिक निवड मंडळ ;

(८) "दुय्यम सेवा" म्हणजे,—

(अ) राज्य शासनाधीन सेवेच्या संबंधात, मुंबई नागरी सेवांचे वर्गीकरण व सेवाप्रवेश नियम, १९३९ अन्वये वर्ग तीन व वर्ग चार म्हणून जिचे वर्गीकरण करण्यात आले असेल आणि भारताच्या संविधानाचा अनुच्छेद ३२०, खण्ड (३) च्या परंतुकान्वये योग्य रीतीने करण्यात आलेल्या विनियमान्वये जीमधील सेवाप्रवेश, महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेतून वगळण्यात आला असेल अशी सेवा; आणि

(ब) नगरपालिकांच्या व जिल्हा परिषदांच्या अधीन असलेल्या सेवेच्या संबंधात, अनुसूची दोन मध्ये विनिर्दिष्ट केलेली सेवा अथवा पदे; आणि

(क) इतर कोणत्याही सेवेच्या संबंधात, विधिद्वारे रचना करण्यात आलेल्या इतर कोणत्याही स्थानिक प्राधिकरणाचे किंवा इतर निगम निकायाचे किंवा राज्य शासन शासकीय राजपत्रातील आदेशाद्वारे, वेळोवेळी, विनिर्दिष्ट करील अशा कोणत्याही सार्वजनिक परिसंस्थेचे कोणतेही पद धरून सेवा ;

परंतु त्यात—

(एक) राज्य शासनाच्या पोलीस विभागाच्या कार्यकारी शाखांतील पदे ; आणि

(दोन) या अधिनियमान्वये करण्यात आलेल्या नियमाद्वारे, ज्या पदावरील नियुक्ती, निवड मंडळाच्या कक्षेतून वगळण्यात आली असेल अशा कोणत्याही दुय्यम सेवेतील पदे ; आणि

(तीन) रचना करण्यात आलेल्या कोणत्याही स्थानिक प्राधिकारणाची किंवा इतर निगम निकायाची किंवा संविधानाचा अनुच्छेद ३२१ अनुसार राज्याच्या विधानमंडळाकडून

करण्यात आलेल्या अधिनियमान्वये जिच्या संबंधात राज्य लोकसेवा आयोगाकडे आता कामे सोपविण्यात आली असतील अशा कोणत्याही सार्वजनिक परिसंस्थेची सेवा;

. . . यांचा समावेश होणार नाही ;

(९) "जिल्हा परिषद" म्हणजे, महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ याच्या अर्थांतर्गत जिल्हा परिषद.

**प्रादेशिक निवड मंडळ व त्याची रचना.**

३. (१) प्रत्येक प्रदेशाकरिता एक निवड मंडळ असेल.

(२) राज्य शासन, प्रत्येक प्रदेशाकरिता एका निवड मंडळाची रचना करील व ते अध्यक्ष आणि विहित करण्यात येतील असे सहा पेक्षा अधिक नसतील इतके इतर सदस्य यांचे मिळून होईल :

परंतु, निवड मंडळाचा एक सदस्य अशी व्यक्ती असेल, जिने तिच्या नियुक्तीच्या तारखेस, एकतर भारत सरकारच्या अधीन अथवा एखाद्या राज्य शासनाच्या अधीन निदान दहा वर्षेपर्यंत पद धारण केलेले असेल ; आणि दोन सदस्य हे, अनुसूचित जाती किंवा अनुसूचित जमाती किंवा भटक्या जमाती किंवा विमुक्त जाती यांतील व्यक्ती असतील.

**स्पष्टीकरण.**—या पोट-कलमात—

(अ) "अनुसूचित जाती" म्हणजे, भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३४१ अन्वये, महाराष्ट्र राज्याच्या संबंधात, ज्यांना अनुसूचित जाती म्हणून समजण्यात येत असेल अशा जाती, वंश अथवा जमाती किंवा अशा जाती, वंश किंवा जमातीचे भाग किंवा त्यातील गट ;

(ब) "अनुसूचित जमाती" म्हणजे, भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३४२ अन्वये, महाराष्ट्र राज्याच्या संबंधात, ज्यांना अनुसूचित जमाती म्हणून समजण्यात येत असेल अशा जमाती किंवा जनजाति समूह किंवा अशा जमाती किंवा जनजाति समूह यांचे भाग किंवा त्यातील गट; आणि

(क) "भटक्या जमाती आणि विमुक्त जाती" म्हणजे, राज्य शासनाकडून वेळोवेळी भटक्या जमाती आणि विमुक्त जाती म्हणून ठरविण्यात येतील अशा जमाती आणि जाती आणि त्यांमध्ये, उपरोक्त अनुच्छेद ३४१ किंवा यथास्थिती अनुच्छेद ३४२ अन्वये त्या जातीच्या किंवा जमातीच्या संबंधात विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या वसतिस्थानांबाहेर राहणाऱ्या अनुसूचित जातीच्या किंवा अनुसूचित जमातीच्या सदस्यांचा समावेश होईल ;

(३) या अधिनियमाच्या आणि तदन्वये करण्यात आलेल्या नियमांच्या उपबंधांस अधीन राहून, निवड मंडळाचा अध्यक्ष व इतर सदस्य यांची राज्य शासनाकडून नियुक्ती करण्यात येईल.

(४) निवड मंडळाच्या अध्यक्षाचे पद रिकामे होईल तर, अथवा असा कोणताही अध्यक्ष, अनुपस्थितीमुळे किंवा इतर कोणत्याही कारणामुळे, आपल्या पदाची कर्तव्ये पार पाडण्यास असमर्थ होईल तर, रिकाम्या पदावर पोट-कलम (३) अन्वये नियुक्त करण्यात आलेली कोणतीही व्यक्ती, त्या पदाची कर्तव्ये पार पाडण्यासाठी अधिकारपद ग्रहण करील तोवर, किंवा यथास्थिती, अध्यक्ष आपली कर्तव्ये पार पाडण्यासाठी कामावर परत रुजू होईल तोवर, ती कर्तव्ये, त्या प्रयोजनास्तव राज्य शासन नियुक्ती करील अशा, निवड मंडळाच्या सदस्यांपैकी एकाकडून पार पाडण्यात येतील.

**सदस्यांच्या अर्हता, त्यांचा पदावधि व त्यांच्या सेवेच्या इतर शर्ती.**

४. कलम ३ च्या उपबंधांस अधीन राहून, निवड मंडळाच्या सदस्यांच्या अर्हता, पदावधि व (वेतन व भत्ते यासहित) सेवेच्या इतर शर्ती या, विहीत करण्यात येतील त्याप्रमाणे असतील :

परंतु, निवड मंडळाच्या सदस्याच्या सेवेच्या शर्तीत, त्याच्या नियुक्तीनंतर, त्याचा तोटा होईल अशा रीतीने बदल करण्यात येणार नाही.

**निवड मंडळाचे अधिकारी व सेवकवर्ग.** ५. प्रत्येक निवड मंडळासाठी, एक चिटणीस आणि राज्य शासन, वेळोवेळी, ठरविल त्याप्रमाणे, इतर अधिकारी व कर्मचारीवर्ग यांची तरतूद करण्यात येईल. चिटणीस, अधिकारी व कर्मचारीवर्ग यांची नियुक्ती राज्य शासनाकडून अथवा राज्य शासनाने याबाबतीत यथोचितरित्या प्राधिकृत केले असेल अशा, उप सचिवापेक्षा खालच्या दर्जाचा नसेल अशा कोणत्याही अधिकाऱ्याकडून करण्यात येईल. चिटणीस, अधिकारी व कर्मचारीवर्ग हा, राज्य शासन सर्वसाधारण अथवा विशेष आदेशाद्वारे निश्चित करील अशा सेवावर्गातील असेल. चिटणीस, अधिकारी व कर्मचारीवर्ग यांच्या सेवेच्या शर्ती, अनुक्रमे ते ज्या सेवावर्गातील असतील त्या सेवावर्गातील शासकीय कर्मचाऱ्यांना ज्या शर्ती लागू असतील त्याच असतील.

**निवड मंडळाची कामे.** ६. विहित करण्यात येतील अशा नियमांस अधीन राहून, दुय्यम सेवांमधील पदांवर नेमण्यासाठी उमेदवार निवडणे आणि त्या सेवाविषयक सर्व बाबींसंबंधी राज्य शासनाकडून मंडळाकडे सोपविण्यात येतील अशी इतर कामे पार पाडणे हे निवड मंडळाचे कर्तव्य असेल :

परंतु, राज्य शासनास, नियमाद्वारे, ज्या परिस्थितीमध्ये, कोणत्याही दुय्यम सेवेतील कोणत्याही पदावरील किंवा पदांच्या वर्गावरील नियुक्तीसाठी उमेदवार निवडणे निवड मंडळास आवश्यक असणार नाही ती परिस्थिती आणि अशा रीतीने मंडळाच्या कक्षेतून वगळण्यात आलेल्या पदावरील किंवा पदांवरील नियुक्ती, नियुक्ती प्राधिकरणाकडून ज्या रीतीने करण्यात येईल ती रीत, याविषयी तरतूद करता येईल.

**तपासणी व चौकशी.** ७. (१) राज्य शासनास, ते (राज्य शासन) निदेश देईल अशा व्यक्तीकडून किंवा व्यक्तीकडून, निवड मंडळाची आणि निवड मंडळाच्या वतीने घेण्यात आलेल्या कोणत्याही परीक्षेच्या संचालनाची किंवा निवड मंडळाच्या कामांच्या संबंधातील कोणत्याही बाबीसंबंधीची तपासणी करविण्याचा आणि कोणत्याही निवड मंडळाशी संबंधित कोणत्याही बाबीसंबंधात त्याच रीतीने, चौकशी करविण्याचा, अधिकार असेल. राज्य शासन, तपासणी किंवा चौकशी करविण्यच्या आपल्या उद्देशासंबंधी, प्रत्येक बाबतीत, संबंधित निवड मंडळास, यथोचित नोटीस देईल ; आणि अशा तपासणीच्या किंवा चौकशीच्या वेळी उपस्थित राहण्याचा आणि आपले म्हणणे मांडण्याचा ज्याला अधिकार असेल अशा प्रतिनिधीची नेमणूक करण्याचा निवड मंडळास हक्क असेल.

(२) राज्य शासन तपासणीच्या किंवा चौकशीच्या निष्कर्षांच्या संबंधातील आपला अभिप्राय निवड मंडळास कळविल आणि त्यास (राज्य शासनास), त्यावरील निवड मंडळाच्या मताची खात्री करून घेतल्यानंतर, करण्यात यावयाच्या कार्यवाहीसंबंधी त्यास (मंडळास) सल्ला देता येईल आणि अशी कार्यवाही, करण्यासाठी कालमर्यादा निश्चित करता येईल.

(३) निवड मंडळ, तपासणीच्या किंवा चौकशीच्या निष्कर्षावर त्याने केली असेल किंवा करण्याचे योजिले असेल अशी कार्यवाही, राज्य शासनास कळवील. असा अहवाल, त्यावरील निवड मंडळाच्या अभिप्रायासह, राज्य शासन निदेश देईल अशा वेळेच्या आत, सादर करण्यात येईल.

(४) निवड मंडळ, निश्चित केलेल्या वेळेच्या आत, राज्य शासनाचे समाधान होईल अशा रीतीने कार्यवाही करणार नाही त्याबाबतीत, राज्य शासनास, निवड मंडळाकडून देण्यात आलेले कोणतेही स्पष्टीकरण किंवा अभिवेदन विचारात घेतल्यानंतर, त्यास योग्य वाटतील असे निदेश देता येतील आणि निवड मंडळ अशा निदेशांचे पालन करील.

**निवड मंडळाचे अहवाल.** ८. निवड मंडळाने केलेल्या कामाचा अहवाल, दरवर्षी, राज्य शासनास सादर करणे हे निवड मंडळाचे कर्तव्य असेल आणि राज्य शासन, असा अहवाल मिळाल्यानंतर त्याची एक प्रत, निवड मंडळाचा सल्ला स्वीकारण्यात आला नसेल अशा, कोणत्याही असल्यास, प्रकरणांच्या बाबतीत असा सल्ला का स्वीकारण्यात आला नाही याबद्दलच्या कारणांचे स्पष्टीकरण देणाऱ्या ज्ञापनासह, राज्याच्या विधानमंडळासमोर मांडण्याची व्यवस्था करील.

९. (१) राज्य शासनास, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, पूर्व प्रसिद्धीच्या शर्तीच्या अधीन राहून, या अधिनियमाचे उपबंध अंमलात आणण्यासाठी नियम करता येतील. नियम करण्याची शक्ती.

(२) या कलमान्वये करण्यात आलेला प्रत्येक नियम, तो केल्यानंतर शक्य तितक्या लवकर, एकाच अधिवेशनात किंवा लागोपाठच्या दोन अधिवेशनात एकूण तीस दिवसांची मुदत होईल इतक्या मुदतीकरिता राज्य विधानमंडळाचे अधिवेशन चालू असताना, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल व ज्या अधिवेशनात तो अशा रीतीने ठेवण्यात आला असेल ते अधिवेशन किंवा त्याच्या लगतनंतरचे अधिवेशन समाप्त होण्यापूर्वी, त्या नियमात कोणताही फेरफार करण्यात किंवा नियम करण्यात येऊ नये म्हणून, दोन्ही सभागृहे संमत होतील व असा निर्णय शासकीय राजपत्रात अधिसूचित करतील तर, तो नियम, अशी अधिसूचना प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून, अशा फेरबदल केलेल्या स्वरूपातच परिणामक्षम राहील किंवा यथास्थिती, मुळीच परिणामक्षम राहणार नाही, तथापि, अशा कोणत्याही फेरफारामुळे किंवा विलोपनामुळे या नियमान्वये पूर्वी केलेल्या किंवा करण्याचे सहून केलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राह्यतेस बाध येणार नाही.

१०. अनुसूची तीनच्या स्तंभ २ मध्ये विनिर्दिष्ट केलेले अधिनियम हे त्या अनुसूचीच्या स्तंभ ३ मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या रीतीने आणि मर्यादेपर्यंत, याद्वारे, सुधारण्यात येत आहेत. विवक्षित अधिनियमांमध्ये सुधारणा.

११. राज्यामध्ये ज्या तारखेस हा अधिनियम अंमलात येईल त्या तारखेस आणि त्या तारखेपासून,— विद्यमान समित्या, मंडळे आणि इतर संस्था विसर्जित करणे; आणि

(१) अशा तारखेच्या लगतपूर्वी, या अधिनियमान्वये निवड मंडळांकडून पार पाडण्यात येत असलेल्या कामांसारखी कामे, ज्यांच्याकडे सोपविण्यात आली असतील अशा कोणत्याही नावाने संबोधण्यात येणाऱ्या सर्व समित्या, निवड मंडळे आणि इतर संस्था विसर्जित होतील आणि त्यांच्या सदस्यांनी आपली पदे रिकामी केली असल्याचे समजण्यात येईल.

(२) अशा कोणत्याही समितीकडून, निवड मंडळांकडून आणि इतर संस्थांकडून कोणत्याही दुय्यम सेवेतील किंवा तीमधील कोणत्याही पदावरील किंवा पदांच्या वर्गावरील नियुक्तीसाठी, अशा तारखेपूर्वी, निवडण्यात आलेल्या उमेदवारांच्या याद्या, जणू त्या याद्यांमधील उमेदवार हे तत्संबंधित निवड मंडळाकडून या अधिनियमाच्या उपबंधांनुसार निवडण्यात आलेले उमेदवार आहेत अशा रीतीने अंमलात असण्याचे चालू राहील. अशा विसर्जनाचे परिणाम.

१२. या अधिनियमाचे उपबंध अंमलात आणताना कोणतीही अडचण उद्भवेल तर, राज्य शासनास, प्रसंगानुसार आवश्यक असेल त्याप्रमाणे, आदेशाद्वारे, अडचण दूर करण्याच्या प्रयोजनार्थ आवश्यक असल्याचे दिसून येईल अशी कोणतीही गोष्ट करता येईल. अडचण दूर करण्याची शक्ती.

700

## अनुसूची एक

[ कलम २(५) पहा ].

| प्रदेश (१) | क्षेत्रे (२) | मुख्यालये (३) |
|---|---|---|
| (अ) मुंबई प्रदेश . . | बृहन्मुंबई आणि ठाणे, कुलाबा व रत्नागिरी जिल्हे . . | मुंबई. |
| (ब) पुणे प्रदेश . . | पुणे, सोलापूर, सातारा, सांगली आणि कोल्हापूर जिल्हे . . | पुणे. |
| (क) नाशिक प्रदेश . . | नाशिक, अहमदनगर, जळगाव आणि धुळे जिल्हे . . | नाशिक. |
| (ड) औरंगाबाद प्रदेश. | औरंगाबाद, बीड, उस्मानाबाद, परभणी आणि नांदेड जिल्हे | औरंगाबाद. |
| (इ) अमरावती प्रदेश . . | अमरावती, बुलढाणा, अकोला आणि यवतमाळ जिल्हे . . | अमरावती. |
| (फ) नागपूर प्रदेश . . | नागपूर, भंडारा, चंद्रपूर आणि वर्धा जिल्हे . . . . | नागपूर. |

## अनुसूची दोन

[ कलम २ (८) पहा. ]

(१) महाराष्ट्र जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्या अधिनियम, १९६१ याचे कलम २३९, खंड (ब) अन्वये स्थापन केलेल्या, जिल्हा तांत्रिक सेवा (वर्ग तीन), जिल्हा सेवा (वर्ग तीन), आणि जिल्हा सेवा (वर्ग चार).

(२) महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम, १९६५ याचे कलम ७६, पोट-कलम (१) अन्वये निर्माण करण्यात आलेली अधिकाऱ्यांची आणि कर्मचाऱ्यांची पदे.

## अनुसूची तीन

(कलम १० पहा)

सुधारलेले अधिनियम

| क्रमांक व वर्ष (१) | संक्षिप्त नाव (२) | सुधारणा (३) |
|---|---|---|
| सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५. | महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१. | १. कलम २ मध्ये— खंड (१३) व (१४) वगळण्यात येतील. २. कलम ९५, पोट-कलम (२) यातील खंड (ब) ऐवजी पुढील खंड दाखल करण्यात येईल :— "(ब) मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र लोक सेवा (दुय्यम) निवड मंडळे अधिनियम, १९७३ खाली निवडलेल्या उमेदवारांना |

अनुसूची तीन—चालू

| क्रमांक व वर्ष (१) | संक्षिप्त नाव (२) | सुधारणा (३) |
| --- | --- | --- |
| | | याद्यांमधून, अधिकाऱ्यांची आणि वर्ग तीन आणि वर्ग चार च्या सेवांमधील सेवकांची, नियुक्ती करील." |
| | | ३. कलमे २४९, २५० आणि २५१ वगळण्यात येतील. |
| | | ४. कलम २७४, पोट-कलम (२) मधील खंड (४०) व (४१) वगळण्यात येतील. |
| सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४०. | महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम, १९६५. | १. कलम ७६ मध्ये—<br>(१) पोट-कलम (२) मधील "अशा कोणत्याही अधिकाऱ्यांच्या आणि सेवकांच्या पात्रता" या मजकुराऐवजी, "महाराष्ट्र लोक सेवा (दुय्यम) निवड मंडळे अधिनियम, १९७३ आणि त्यान्वये केलेले नियम यांच्या उपबंधांस अधीन राहून, अशा कोणत्याही अधिकाऱ्यांच्या आणि सेवकांच्या अर्हता" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;<br>(२) पोट-कलम (३) ऐवजी पुढील मजकूर दाखल करण्यात येईल :—<br>" (३) पोट-कलम (१) अन्वये निर्माण करण्यात आलेल्या पदांवरील सर्व नियुक्त्या महाराष्ट्र लोक सेवा (दुय्यम) निवड मंडळे अधिनियम, १९७३ अन्वये निवडलेल्या उमेदवारांच्या याद्यांमधून, मुख्य अधिकाऱ्यांकडून किंवा नगरपालिकेने त्या प्रयोजनासाठी यथोचितरीत्या प्राधिकृत केलेल्या कोणत्याही व्यक्तीकडून करण्यात येतील." |
| | | २. कलम ७९, पोट-कलम (२) मध्ये—<br>(अ) परंतुकापूर्वी, पुढील परंतुक समाविष्ट करण्यात येईल :—<br>"परंतु,—<br>(एक) एखाद्या अधिकाऱ्याने किंवा सेवकाने धारण केलेल्या पदाचे किमान वेतन (भत्ते वगळून) दरमहा रु. ७५ पेक्षा कमी असेल तर, स्थायी समितीस आणि नगर- |

अनुसूची तीन—समाप्त

| क्रमांक व वर्ष (१) | संक्षिप्त नाव (२) | सुधारणा (३) |
|---|---|---|
| | | पालिका तसे ठरवील तर, अध्यक्षास अधिकाऱ्यावर किंवा सेवकावर शास्ती लादता येईल. |
| | | (दोन) अधिकाऱ्याने किंवा सेवकाने धारण केलेल्या पदाचे किमान वेतन (भत्ते वगळून) दरमहा रु. ७५ किंवा त्यापेक्षा अधिक असेल तर, नगरपालिकेस किंवा नगरपालिका तसे ठरवील तर, स्थायी समितीस, अधिकाऱ्यावर किंवा सेवकावर शास्ती लादता येईल;" आणि |
| | | (ब) विद्यमान परंतुकातील "परंतु" या शब्दांऐवजी " आणखी असे की" हे शब्द दाखल करण्यात येतील. |

(यथार्थ अनुवाद)

**वा. स. कुलकर्णी,**

भाषा संचालक, महाराष्ट्र राज्य.